पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा.
स्टेट बँक ऑफ इंडिया चौक, ता. व .जि. बुलढाणा - ४४३००१
Email-sp.buldhana@mahapolice.gov.inदुरध्वनी क्र. ०७२६२-२४२१०१ फॅक्स क्र.०७२६२-२४२२४६

९१६०९ 31 JUL 2024

# प्रसिध्दीपत्रक

## बुलढाणा जिल्हा पोलीस शिपाई भरती 2022-2023

## दिनांक 02.08.2024 रोजी एडेड हायस्कुल, चिखली रोड, बुलडाणा येथे घेण्यात येणाऱ्या पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदाच्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने

## उमेदवारांना सुचना

***********

पोलीस अधीक्षक बुलढाणा या आस्थापनेवर सन 2022-23 मध्ये रिक्त असलेल्या 08 पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदांकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली मैदानी चाचणी मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मा.अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा. मुंबई आदेश क्रमांक अपोमसं/प्रशि/पोशि भरती/बॅण्डस्मन/ 173/202 दि. 25/06/2024 मधील तरतुदीनुसार उमेदवारांची दिनांक 08.07.2024 ते 09.07.2024 रोजी अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) प्रभा हॉल, पोलीस मुख्यालय बुलडाणा येथे घेण्यात आली आहे. सदर अर्हता अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये पात्र ठरलेल्या 100 उमेदवारांमधुन जाहिरातीमध्ये दिलेल्या रिक्त पदांच्या 1:10 या प्रमाणात गुणवत्तेनुसार 80 लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी दिनांक 21/07/2024 रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

1. www.buldhanapolice.gov.in
2. जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष, बुलढाणा येथे नोटीस बोर्डावर
3. पोलीस मुख्यालय बुलढाणा येथे नोटीस बोर्डावर

तरी बुलढाणा जिल्हा पोलीस दलाची पोलीस शिपाई (बॅण्डस्मन)पदाची लेखी परीक्षा ही **दिनांक 02.08.2024 रोजी एडेड हायस्कुल, चिखली रोड, बुलडाणा येथे दुपारी 16.00 ते 17.30 या वेळेत घेण्यात येणार आहे**. त्यानुसार उमेदवारांची परीक्षा केंद्रावर बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी घेण्यात येणार असुन उमेदवारांनी 02 (तीन) तास अगोदर म्हणजेच दुपारी 14.00 वा. परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक राहील. तसेच उमेदवारांनी आवेदन अर्ज, प्रवेश पत्र, दोन (02) पासपोर्ट फोटो, व स्वत:ची ओळख पटविण्यासाठी लगतचा फोटो असलेले आधार कार्ड / पॅन कार्ड / वाहन परवाना / मतदान कार्ड सोबत आणावे.

सदर लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शकपणे व नि:पक्षपातीपणे होणार असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार होणार नाही तसेच उमेदवारांनी प्रवेश करण्यापुर्वी मोबाईल /इलेट्रॉनिक्स किंवा तत्सम प्रकारचे उपकरणे व इतर साहित्य परीक्षा केंद्रामध्ये घेऊन येऊ नये / सोबत बाळगण्यात येऊ नये याबाबत दक्षता घ्यावी. सदर लेखी परीक्षेचे अनुषंगाने बुलडाणा जिल्हा पोलीस दलातील गोपनिय यंत्रणा कार्यन्वीत राहणार असुन उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभणास / अमिषास बळी पडु नये, व कोणताही गैरप्रकार होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबतची माहिती प्रत्यक्ष अवगत करुन दयावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाचे वतीने करण्यात येत आहे.

पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय बुलढाणा

(बी.बी. महामुनी)
प्र. पोलीस अधीक्षक, बुलढाणा